## B.A. Part-I (Semester—I) Examination

## (Literature of Modern Language)

## MARATHI LITERATURE

वेळ : 3 तास] [एकूण गुण : 80

139

**सूचना :**—बहुपर्यायी प्रश्नांसाठी सुरुवातीस सोडविलेल्या प्रश्नांची उत्तरे मूल्यांकन करताना गृहित धरली जातील.

1. संदर्भासह स्पष्टीकरण लिहा : 16

(अ) 'काय कामांचं हाये सालं हे चटक् मटक् खाणं ? बटकीचा खाल्ला घास आंगी लागत नाई. आशा खाव्यापेक्षा सुखाची चटणी भाकर पुरती ... '

**किंवा**

'आता चांगली भारी कलमाची केस करतीन पोलीस अन् दोन्हीं पार्‍या कोर्टकचेऱ्या करता करता फेसरी येतीन'.

(ब) 'तुमच्यापेक्षा त आमाले जास्त गांजून राह्यली हो पाणी टंचाई हकनाक या खल्डा पडेल गावात बदली झाली आसं वाटते'.

**किंवा**

'आरे ह्या पुठाऱ्यायची बोर पिकली नाई, तरी जरा वरच्या लेवलच्या पुढाऱ्यायची पिकंल .... लोकशाही हाये ही. भ्रष्टाचार हाच शिष्टाचार झाला इथी ... '

(क) जुने जाऊ द्या मरणालागुनि ;
जाळुनि किंवा पुरूनी टाका ;
सडत न एक्या ठायी ठाका ;
सावध! एका पुढल्या हाका ;

**किंवा**

मिचकावुनि मग उजवा डोळा
आणि उडवुनी डावी भिवयी
भिरकावुनि ती तशिच द्यायचा
लकेर बेचव जैशी गवई।

(ड) चला रे चक्रांनो

फिरत गरारा

गर्जत पुकारा

आपुला दरारा !

**किंवा**

जनतेच्या बाहूंमध्यें

सागराचे बळ आहे

जनतेच्या इच्छेमध्यें

नियतीचा नेट आहे ;

2. 'बबन'चे व्यक्तिचित्र तुमच्या शब्दात रेखाटा. 16

**किंवा**

'तहान' कादंबरीचा आधारे बदलते ग्रामवास्तव चितारा.

3. (अ) 'राघोजी शेवाळे' ची व्यक्तिरेखा रेखाटा. 8

**किंवा**

'तहान' कादंबरी मध्ये चित्रित झालेली पाणीटंचाईची भीषणता स्पष्ट करा.

(ब) 'रामकोर'ची व्यक्तिरेखा साकारा. 8

**किंवा**

'तहान' कादंबरीतील तुम्हाला आवडलेल्या कोणत्याही एका प्रसंगाचे वर्णन करा.

4. (अ) विंदा करंदीकरांच्या कवितांमधून मानवतावादाची जाणीव कशाप्रकारे व्यक्त झाली ते लिहा. 8

**किंवा**

'सामाजिक समतेचा अत्यंत प्रभावी उच्चार केशवसुत्तांच्या कवितेतून व्यक्त झाला' या विधानाची सत्यता पडताळा.

(ब) कवी नारायण सुर्वे यांच्या कवितेतील संघर्ष शब्दबद्ध करा. 8

**किंवा**

खालीलपैकी कोणत्याही **एका** कवितेचे रसगंहण करा :

(1) 'अहि-नकूल'

(2) 'मज लोभस हा इहलोक हवा

(3) 'नवा शिपाई'।

5. खालील वस्तूनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नातील अचूक उत्तर निवडा : 16

(1) बबनच्या बहिनीचे नाव काय ?

(अ) कविता (ब) सखू

(क) रत्ना (ड) वर्षा

(2) प्रमोद नवले हा कोणत्या वृत्तपत्राचा वार्ताहर होता ?

(अ) लोकसत्ता (ब) देशोन्नती

(क) लोकवार्ता (ड) जनवार्ता

(3) सतीश मंगळेचा व्यवसाय कोणता ?

(अ) वेल्डींग (ब) किराणा दुकान

(क) वार्ताहर (ड) ढाबा

(4) प्रमोद नवलेने छगनशेठला किती हजारात जागा विकली ?

(अ) चाळीस हजार (ब) पन्नास हजार

(क) साठ हजार (ड) सत्तर हजार

(5) बबन सारखी टायरची गाड़ी बनवायचे कोणी ठरवलं होतं ?

(अ) शिवराम भुसारी (ब) प्रमोद नवले

(क) सोनाजी देवकर (ड) सुरेश ठोंबरे

(6) खालीलपैकी कोणते गाव आगीत भस्मसात झाले होते ?

(अ) सारंगपूर (ब) पारखेड

(क) गायगाव (ड) गोटखेड

(7) सरकारने पाणी टंचाईवर किती खर्च करण्याचे जाहीर केले ?

(अ) दोनसे पासठ कोटी (ब) दोनसे सत्तर कोटी

(क) दोनसे ऐंशी कोटी (ड) तिनशे कोटी

(8) एस. टी. डी. हे टोपननाव कोणाचे होते ?

(अ) बबन (ब) प्रमोद नवले

(क) मोहन काळे (ड) सुरेश ठोंबरे

(9) आम्हांला वगळा - गतप्रभ झणी होतील ____________ .

(अ) आंगणे (ब) तारांगणे

(क) नभांगणे (ड) कंगणे

139 139 139 139 139

(10) __________ सत्व माझ्या

लाभुं दे भाषा-शरीरा.

(अ) गांधारीचे (ब) कुंतीचे

(क) द्रोपदीचे (ड) सीतेचे

(11) गणपत वाणी कोणती गाथा वाचतो ?

(अ) श्रीनाम्याची (ब) श्रीतुक्याची

(क) नवनाथांची (ड) एकनाथांची

(12) 'जिणे गंगौघाचे पाणी' ही कविता कोणाची ?

(अ) कुसुमाग्रज (ब) इंदिरा संत

(क) बा. भ. बोरकर (ड) मर्ढेकर

(13) आगगाडी जमीनीस काय म्हणजे ?

(अ) दुर्बळ (ब) अपंग

(क) हीणकस (ड) पाषाणहृदयी

(14) ________ ओढुन शेला।

(अ) हेमंताचा (ब) शरदाचा

(क) वसंताचा (ड) ग्रीष्माचा

(15) 'केशवसुत' हे कोणत्या कवीचे टोपणनाव आहे ?

(अ) कृष्णाजी केशव दामले (ब) गोविंद केशव आमले

(क) विष्णु वामन शिरवाडकर (ड) बा. सी. मर्ढेकर

(16) 'ती जनता अमर आहे!' ही कविता कोणाची ?

(अ) कुसुमाग्रज (ब) नारायण सुर्वे

(क) बा. सी. मर्ढेकर (ड) विंदा करंदीकर

139 139 139 139 139